**फौ. किरकोळ अर्ज क्र.८४/२०२१** **निशाणी ७८**
**अर्जदारा तर्फे साक्षीदार क्र.०२**
**मी शपथेवर कथन करतो की,**
**नाव – अभिजीत संभाजी करवार,**
**वय** – ३५ वर्षे, **कामधंदा** – नोकरी, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कुकाणा.
**रा. –** कुकाणा, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**सरतपास अर्जदारातर्फे अभियोक्ता श्री. डी. टी. बट्टुळे यांचे कडून –**

०१. आम्हाला बँकेच्या नावाने कोर्टाचे साक्षी समन्स आले होते. सदर समन्स मध्ये चंद्रकांत यादव कांबळे, धोंडाबाई चंद्रकांत कांबळे यांचे खात्याचे तपशिलाचे कागदपत्र आणण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांचा खाते उतारे मी सोबत आणले आहेत.

०२. मी बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कुकाणा येथे जुलै २०२४ पासुन शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. मी बँकेची सर्व कागदपत्रे हाताळतो व मला त्याची माहिती आहे. मी निशाणी क्र.७४ वरील ६५ बी चे प्रमाणपत्र दिले आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. मी आज रोजी सदर माहिती मागविलेल्या खातेदाराचा खातेउतारा आणला आहे. मी आज रोजी ठेव पावत्या आणल्या नाहीत. मला आता सामनेवालाचे यांचा केस मध्ये दाखल केलेले खातेउतारे दाखविले, सदर खातेउता–यापैकी पहिला खातेउतारा हा दि. ०१/०१/२०२० ते १७/०१/२०२५ आणि दुसरा खातेउतारा दिनांक ०१/०१/२०२५ ते १९/०१/२०२६ पर्यंत आहे. सदर खाते उता–यांन्वये दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी त्याची खात्यातील शिल्लक रु.२३,४०५/– रुपये आहे व पेन्शनची रक्कम रु.२२,०९७/– सदर महिन्यात जमा झाली आहे. त्याची दर महिन्याची पेन्शन जमा झाल्याची नोंद सदर उता–यावर आहे. सन २०२० पासुन डिसेंबर, २०२५ पर्यंत पेन्शन जमा झाल्याची नोंद आहे. सदर दोन्ही उता–यांवर माझी सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर प्रती मी संगणकामधून प्रिंट केल्या आहेत. त्यास **निशाणी क्र.७९ आणि ८०** देण्यात येतात.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास**
**सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. ए. एल. वेलदे यांचेकडून –**

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर बँकेत रुजू होण्या पूर्वी सामनेवाला यांचे

बँकेच्या व्यवहाराबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. सामनेवालाचा राहण्याचा पत्ता काय हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७९ व ८० वरील खातेउता–यावरील व्यवहाराबाबत कोणाकडून किती रक्कम आली व कोणाला किती दिली या बाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर, २०२५ च्या जमा झालेल्या रकमेमधून कर्ज खात्यात किती रक्कम गेली अथवा इतर कोणते व्यवहार झाले या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खातेउता–यांनुसार सामनेवालाच्या खात्यामधून दरमहा रु.९,०००/– कर्ज खात्यात वर्ग केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवालाचे किती कर्ज आहे या बाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पेन्शनमधून किती कर्ज वजा जाते व किती शिल्लक आहे या बाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७९ व ८० मध्ये किती रकमा खात्यात जमा झाल्या व किती कमी झाल्या हे मला व्यक्तीशः माहित नाही.

**प्रश्न** – दर महिन्याला येणा–या पेन्शनच्या रकमेमध्ये किती कटींग होती हे त्यामध्ये नमूद नाही ?

**उत्तर** – दर महिन्याला पेन्शनची रक्कम जमा झाल्याने शिल्लक वाढत गेली आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवालाच्या कोणत्याही ठेव पावत्या आमच्या बँकेत जमा नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवालाच्या पेन्शन खात्यातून कर्ज खात्यात जास्त प्रमाणात जमा झालेली आहे व ती दरवर्षी जमा होते. हे म्हणणे खरे आहे की, जमा झालेली पूर्ण रक्कम सामनेवालाच्या हातात पडत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर उता–यामध्ये कर्ज खात्याची रक्कम दाखविली नसल्यामुळे सदरचे चुकीचे उतारे मी दाखल केले आहेत.

उलटतपास पूर्ण.

श्रुतलेखनोत्तर स्वाक्षांकित

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.02.12 17:50:36 +0530

दिनांकः– १२/०२/२०२६

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२) शेवगाव.